नियमित दिवाणी दावा कं १४४/२०१७
जुना कं.५६१/२०११
प्रभाकर वि. श्रीराम+३
नि.क.१०३

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार कं.१**

**<u>साक्षीदाराचा शपथेवर सरतपास श्री.जी.आर.हुंगे प्रतिवादीतर्फे</u>**

१. मी शपथेवर खरे सांगतो की, माझे वकील साहेबांनी मी दिलेल्या माहीती प्रमाणे माझे सरतपासणीचे शपथपत्र तयार केले व मला वाचून व समजावून सांगितले आणि त्यानंतर मी शपथपत्रावर सही केली. मला आता शपथपत्र **निशाणी कं.१०३** दाखविले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. नोंदणीकृत खरेदीखत कं.४८/१९८७, ४७/१९८७ व ४९/१९८७ श्री. मनोहर आडकुजी खोंडे यांनी नोंदवुन दिलेले आहेत. सदर तिनही खरेदीखत अनुकमे **निशाणी कं.१०६ ते १०८** प्रमाणे आहेत. खरेदीखतांमधील मजकुर खरा व बरोबर आहे. नायब तहसिलदार उमरेड यांचे दि.१४.०७.२००४ रोजीचे आदेशाची प्रत **निशाणी १०९** प्रमाणे आहे. जिल्हा व सत्र न्यायालय नागपुर यांचेकडील किरकोळ दिवाणी अपील कं.१२०/२०१२ मधील दि.२२. ०८.२०१२ रोजीची प्रत **निशाणी ११०** प्रमाणे आहे. दाव्यामध्ये दाखल केलेले इतर महसुल दस्त अनुक्रमे **निशाणी १११ ते ११८** प्रमाणे आहेत. उपविभागीय अधिकारी उमरेड यांचे दि.१७.०३.२००५ रोजीच्या आदेशाची प्रत **निशाणी ११९** प्रमाणे आहे. वादमिळकतीबाबत अधिकार अभिलेख दस्ताची प्रमाणित प्रत **निशाणी १२०** प्रमाणे आहे.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास श्री.ए.बी.पोंगडे वादीतर्फे</u>**

२. आजरोजी माझे हिश्यातील जमिनीचा गट कं.६५/३ असा आहे. एकत्रिकरणापुर्वी सदर जमिनीचा सर्व्हे कं.१३५ असा होता. बंदोबस्त रेकॉर्ड नुसार माझे शेताचा सर्व्हे कं.१२१ होता हे मला माहिती नाही. आजरोजी वादी यांचे शेताचा नविन गट कं.६६ आहे. हे म्हणणे खरे आहे

DISTRICT COURT NAGPUR

की, एकत्रिकरणादरम्यान वादीचे शेताला सर्व्हे नं.१३८ असा पडला होता. बंदोबस्त रेकॉर्डनुसार वादीचे शेताला सर्व्हे क्रं.१२० पडला होता हे मला माहिती नाही. वादी यांची जमिन व माझी जमिन एकाच खोंडे कुटुंबाची होती हे म्हणणे बरोबर नाही. वादी यांची जमिन त्यांचे वडीलांनी सन १९६३ साली विकत घेतली होती हे मला माहिती नाही. वादीचे वडील यांनी एकुण ८.६५ हे.आर. खोंडे परिवाराकडुन विकत घेतली होती हे मला माहिती नाही. वादी व त्यांचा भाउ केशव यांचे दरम्यान सन १९९८ मध्ये वाटणी झाली होती हे मला माहिती नाही.

३. आम्ही तिन्ही भावांनी खरेदीखत निशाणी १०६ ते १०८ प्रमाणे एकुण ५.७७ हे.आर. जमिन विकत घेतली होती. आम्ही शेती विकत घेतांना मोजणी करून घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही शेताची मोजणी सर्वप्रथम सहा वर्षानंतर सन १९९३ मध्ये केली होती. आम्ही शेती विकत घेण्याचे एक वर्षापुर्वी शेती विकणार मालकाने शेताची मोजणी केली होती. सदर मोजणीबाबत कुठलाही नकाशा दाव्यात दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेती विकत घेतली तेव्हापासुन सदर शेताची वहिवाट तशीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांचे शेताची वहिवाट आम्ही शेती विकत घेतली तेव्हापासुन म्हणजेच १९८७ पासुन जशी होती तशीच आहे. आम्हाला शेतमालकाने समजावुन दिल्यानुसार आम्ही शेतीचे वहितीमध्ये आहोत.

४. आमच्या शेताच्या दक्षिणेकडुन पुर्व पश्चिम नाला आहे. वादी यांचे शेताचे पश्चिमेकडुन माझी शेती आहे. माझे शेताच्या उत्तरेस माझे भावाची गट क्रं.६५/३ ची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, भगवान वैद्य यांची शेती गट क्रं.६५/३ च्या उत्तरेला गट क्रं.८७ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शेताचे दक्षिणेकडील नाला २५ फुट रूंदीचा आहे. सदर नाला तीन ते चार फुट खोल आहे. माझे शेताच्या पुर्व आणि दक्षिण दिशेच्या

DISTRICT COURT NAGPUR

मध्य भागी (आग्नेय) भागात आमचे गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हे गावामधुन वरिल नाल्याद्वारे शेत गट क्रं.६६/२ मध्ये येतात. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या शेतात गट क्रं.६६/२ मध्ये नाल्याला लागुन सागाची झाडे आहेत. सदर सागाची झाडे तीस वर्षापेक्षा जुनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही शेती विकत घेतली त्यानंतर सन १९८९ मध्ये वादीचे शेताकडुन नाली खोदली होती. साक्षीदार सांगतात की सदर नाली माझे हद्दीमध्ये खोदली होती. सदर नालीमधील माती माझे शेतात पश्चिम भागाकडुन टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नाली वादी व माझे शेताच्या धु–यावर खोदली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नालीच्या पुर्व भागाकडे माझी कुठलीही जमिन नाही. माझे शेतात जाण्याकरीता वापरीत असलेल्या रस्त्यासंदर्भात कुठलेही शासकीय रेकॉर्ड नाही. मी धु–यावरून रस्ता वापरण्याबाबत कुठल्याही न्यायालयात परवानगी अर्ज दाखल केलेला नाही.

५. मी नायब तहसिलदार उमरेड यांचेकडे माझे शेताकरीता रस्ता मिळण्याबाबत अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्ज नायब तहसिलदार यांनी खारिज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, नायब तहसिलदार यांचे आदेशाविरूध्द मी अपिल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांनी एस.एल.आर. नागपुर यांचेकडे स्वत:च्या शेताचे क्षेत्रफळ कमी असल्याबाबत तक्रारअर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्ज एस.एल.आर.नागपुर यांनी खारिज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, डि. डी.एल.आर यांनी त्यांचेकडील अपीलामधुन सदर प्रकरण पुन्हा एस.एल.आर. यांचेकडे फेरचौकशीकरीता पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, एस.एल. आर यांनी चौकशी करून अहवाल एस.डी.ओ. उमरेड यांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, एस.डी.ओ. यांनी सदर प्रकरण खारिज केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर वादी यांनी उपजिल्हाधिकारी यांचेकडे अपिल

केली होती. हे म्हणणे खरे आहे की, उपजिल्हाधिकारी यांनी वाद दिवाणी स्वरूपाचा असल्यामुळे दिवाणी कोर्टात दाद मागण्याबाबत सुचना केली होती.

६. हे म्हणणे खरे आहे की, वादी याचेसोबत असलेल्या वादावरून एस.डी.ओ. उमरेड यांचेकडे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४५ नुसार प्रकरण सुरू होते. हे म्हणणे खरे आहे की, वादीविरूध्द फौजदारी मामला क्रं.५६५/२००६ नुसार एस.डी.ओ. यांचे जे.एम.एफ.सी. कोर्ट उमरेड येथे खटला सुरू करण्यात आला होता. सदर प्रकरणामध्ये माझी तसेच माझे भावाची साक्ष झाली होती. सदर प्रकरणात दि.१६.०१.२०१० रोजी वादी व त्याचे भावाची निर्दोष मुक्तता झाल्याचे मला माहिती नाही.

**वादीचे वकिलांचे विनंतीवरून साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड
उमरेड

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर.,
दिनांक : ०९/०४/२०१९.

DISTRICT COURT NAGPUR